# समारोप

## समारोप

१९ व्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्रात सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळीचा मोठया प्रमाणात प्रसार झाला. ब्राम्हो समाज, प्रार्थना समाज, आर्य समाज व थिऑसॉफिकल सोसायटी इ. अनेक संप्रदायांनी ही सुधारणा चळवळ सुरू केली होती. महर्षि दयानंद सरस्वतींनी इ.स. १८७५ मध्ये मुंबई येथे स्थापन केलेल्या आर्य समाजाने सुरू केलेली सामाजिक व धार्मिक सुधारणेची चळवळ सर्वांना समानतेची शिकवण देणारी होती. मात्र आर्य समाजाची तत्वे व शिकवण तत्कालीन पुरातनमतवादी लोकांना आवडली नाही. दयानंद सरस्वतींच्या पुणे येथील व्याख्यानाने तर सर्व लोक भारावून गेले. सनातनवाद्यांच्या प्रतिकाराला बळी न पडता महर्षि दयानंदांनी आपल्या आर्य समाजाचा उत्तरेकडील प्रदेशामध्ये प्रसार केला. मात्र दक्षिणेमध्ये तत्कालीन स्थितीत समाजाचा प्रसार होऊ शकला नाही. आर्य समाजाचा प्रसार महाराष्ट्रामध्ये म्हणजेच तत्कालीन मुंबई प्रांतात सुध्दा फारसा होऊ शकला नाही. महर्षि दयानंदांचे पुणे येथील (१८७६) व्याख्यान ऐकण्याचा लाभ मराठवाडयातील फत्तेहाबाद (सध्या किल्ले धारूर) येथील श्री. गोकुळप्रसाद तिवारी व त्यांचे सहकारी श्री. भगवान स्वरूप यांना मिळाला. दयानंदांची समानतेची शिकवण ही हिंदूमधील जातीचे नव्हे तर धर्माचे रक्षण करणारी आहे असे त्यांना वाटू लागले. किल्ले धारूर हा भाग तेंव्हा निजामाच्या वर्चस्वाखाली होता. निजामाचे धार्मिक धोरण मुसलमानांना पोषक व बरेचसे असहिष्णु होते. निजामी शासकांकडे समानतेच्या विचारांचा अभाव होता. त्यामुळे आपण मराठवाडयात आर्य समाजाची स्थापना करून स्वामी दयानंदांच्या विचारांचा प्रसार आपल्या प्रदेशात केला तर ते निश्चित फलदायी ठरेल असे त्या दोन तरूणांना वाटले. त्यांनी इ.स. १८९१ मध्ये ' धारूर ' येथे आर्य समाजाची स्थापना केली. निजाम राज्यात आर्य समाजाची प्रथम स्थापन करणारे समाजी तसे सर्वसामान्यच होते. पण त्यांच्याजवळ असणारी विचारांची शिकवण मात्र असामान्य होती, हे हैद्राबाद संस्थानातील व

पर्यायाने मराठवाड्यातील आर्य समाजाच्या चळवळीचा आढावा घेतल्यानंतर दिसून येते.

मराठवाड्यात धारूर येथे स्थापन झालेली शाखा ही दक्षिणेतील मुंबईनंतरची समाजाची दुसऱ्या क्रमांकाची शाखा होती. महर्षि दयानंदांना आपल्या विचारांचा प्रसार दक्षिणेच्या प्रदेशात करता आला नाही. तथापि त्यांच्या आर्य समाजाने हैद्राबाद राज्यामध्ये महत्त्वपूर्ण कार्य केले. दक्षिणेत आर्य समाजाशिवाय इतरही अनेक सामाजिक व धार्मिक सुधारणा चळवळी होत्या. मात्र आर्य समाजाची समानतेची शिकवण्ण हेच त्यांच्या निजामी राज्याती प्रसाराचे मुख्य कारण होते. हैद्राबाद राज्यातील हिंदूंना आपल्या धर्माचे व धार्मिक हक्कांचे रक्षण करण्यासाठी एखादी संस्था हवी होती ती आर्य समाजाच्या रूपाने त्यांना मिळाली. धारूर हे गाव सध्या केज तालुक्यामध्ये आहे. तेच आर्य समाजाच्या प्रचार कार्याचे मराठवाड्यातील केंद्रस्थान होते. ` किल्ले धारूर ` हे गावाचे नाव तेथील बादशहाच्या दक्षिणेतील किल्ल्यावरून पडलेले आहे. तो किल्ला शहाजहान बादशहाच्या दक्षिणेतील विजयाचे प्रतिक म्हणून ओळखला जातो. त्यास शहाजहानने फत्तेहाबाद असे नाव दिले होते. त्यावरून मोगलांच्या आक्रमणाची झळ त्या प्रदेशासुध्दा लागली होती हे स्पष्ट होते. तेथे हिंदू संस्कृतीची व धर्माची स्थिती शोचनीयच असणार. धर्म संरक्षणाची आस असलेल्या धारूरवासीयांनी महर्षि दयानंदांच्या शिकवणुकीने प्रभावित होऊन आर्य समाज स्थापन केला. पुढे इ.स. १८९२ मध्ये पं.केशवराव कोरटकर यांनी हैद्राबाद येथे आर्य समाजाची स्थापना केली. पं. कोरटकरसुध्दा मूळचे परभणी जिल्ह्यातील होते. इ.स. १८९२ मध्ये हैद्राबाद येथे आर्य समाज स्थापन झाल्यामुळे त्यांचा निजामी राज्यात मोठया प्रमाणात प्रसार व प्रचार होऊ शकला. समाजाचे बरेचसे कार्यकर्ते खेडोपाडी जाऊन लोकांना प्रवचने देऊ लागले. आर्य समाजाची शिकवण ही ` ना जात, ना पात ` अशा समानतेच्या विचारावर आधारलेली आहे व ती हिंदू धर्माचे रक्षण करणारी आहे असे लोकांना सांगण्यात येऊ लागले. १९ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात व २० व्या शतकाच्या

पुर्वार्धात समाजाच्या अनेक शाखा स्थापन होऊ लागल्या. सुरवातीच्या काळात हैद्राबाद राज्यात शाखांची संख्या हाताच्या बोटावर मोजण्या इत्पतच होती. तरी सुध्दा संस्थानात आर्य समाजाचा बराच प्रभाव होता. तत्कालीन हैद्राबाद राज्यामधील या आर्य समाजी शाखांच्या स्थापनेची नोंद उत्तरेकडील आर्य समाजाने घेतली होती. तेंव्हा ' लाहोर ' हेच देशातील आर्य समाजाच्या चळवळीचे मुख्य केंद्र होते. नंतर हे कार्यालय दिल्ली येथे आणण्यात आले. उत्तरेकडील अनेक आर्य समाजीस्टांनी हैद्राबादच्या निजामी राजवटीस प्रतिकार करणा-या समाजास मोठया प्रमाणात सहकार्य दिले. तसेच अनेक प्रचारकांनाही हैद्राबाद राज्यात पाठविण्यात येऊ लागले. त्या प्रचारकांच्या वक्तृत्वाने व अभ्यासाने हैद्राबाद संस्थानातील लोक आर्य समाजाच्या विचाराने प्रभावित झाले. त्यांना आपणही आता आर्यमय व्हावे असे वाटू लागले. परंतु सनातनवादी हैद्राबादमध्येही आर्य समाजाच्या विचाराला अटकाव करू लागले. सनातनवाद्यांना आर्य समाजाचा वाढता प्रभाव सहन होईनासा झाला. त्यांना आता आपला धर्म बुडतो की काय असे वाटू लागले. त्यासाठी त्यांनी आर्य समाजाचे संस्थानातील प्रचार कार्य बंद पडावे म्हणून निजाम सरकारशी हातमिळवणी केली. जेंव्हा निजामाला सुध्दा ही चळवळ आपल्या अधिसत्तेस आव्हान देणारी ठरेल असे वाटू लागले तेंव्हा त्याने चळवळीस प्रतिबंध करण्यास प्रारंभ केला. केवळ सनातनवाद्यांच्या कुटील कारवायामुळेच सरकारने हा पवित्रा घेतला. अशा स्थितीतही आर्य समाजाने आपले कार्य हैद्राबाद येथील रेसिडेन्सी विभागामधून चालवले होते. हा भाग ब्रिटिशांच्या ताब्यात असे. तेथे निजामाची हुकमत चालत नसे. त्याचा फायदा आर्य समाजास घेता आला. कदाचित ब्रिटिशांनाही ही चळवळ जर निजाम सरकारला डोकेदुखी ठरणार असेल तर हवीच होती. त्याचे प्राबल्य कमी होऊन तो दुबळा व्हावा व हैद्राबाद संस्थानही ब्रिटिशमय करावे असा त्यांचा क्यास का नसावा ? हैद्राबाद राज्यात इ.स. १८३१ ते १९३० पर्यन्तच्या काळात आर्य समाजाने आपल्या अनेक शाखा स्थापन केल्या. पं. केशवराव कोरटकरांसारखे वकील आर्य समाजास लाभले होते. त्यांच्याच प्रयत्नाने व उत्तरेतील

आर्य समाजाच्या सहकार्याने ही चळवळ हैद्राबाद राज्यात पसरली. मात्र चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे निजाम सरकारनेही प्रतिबंधात्मक तरतूद करून ठेवलेली होती. तथापि आर्य समाजाने सुरुवातीच्या काळात आपले सामाजिक व धार्मिक कार्य जोमाने सुरू ठेवले.

मराठवाडा हा तत्कालीन हैद्राबाद राज्यातील चळवळीचा केंद्रबिंदू होता. तसेच मराठवाड्याच्या सीमेला ब्रिटिश साम्राज्याच्या सीमा भिडलेल्या होत्या. त्यामुळे ब्रिटिश प्रांतातील प्रत्येक चळवळीचे साद पडसाद मराठवाड्यात उमटत होते. तेथूनच ब्रिटिश भारतातील चळवळींचे हैद्राबाद राज्यात लोण पसरत असे. सुरुवातीस धारूर ही शाखा मराठवाड्यातील आर्य समाजाची अग्रणी शाखा होती. त्यानंतर हळूहळू आर्य समाजाचा मराठवाड्यात प्रसार वाढत गेला. " निजाम सरहदके बाहर नही जायेंगे और दि के उपर कमर नहि बांधेंगे " अशा वल्गना करणाऱ्यांच्या राज्यात आर्य समाजास आपले कार्य करावे लागले. अल्पसंख्यांक निजामी सत्ताधीशांनी बहुसंख्यांक हिंदूंवर अन्याय, अत्याचार केले आणि धर्मांतराच्या माध्यमातून त्यांना त्रस्त केले. अनेक अडाणी, दुर्बल व अशिक्षित लोक निजामाच्या आमिषांना बळी पडले. आता आपला धर्मच संपतो की काय असा धोका हिंदूंना भेडसावत होता. तेंव्हा हिंदूंना आर्य समाजाचाच आधार वाटला. बहुतेक जण आर्य समाजाच्या ध्वजाखाली एकत्र येऊ लागले. पण हिंदूंना लाभणारी ही ध्वजाची सावली व त्याखाली असणारी प्रजा याने निजाम अस्वस्थ झाला. निजामी जुलमाचा प्रतिकार करण्यासाठी आर्य समाजास आपले धार्मिक व सामाजिक कार्य करीत असताना राजकीय रंगही धारण करावा लागला. आर्य समाजाच्या धार्मिक व सामाजिक कार्यामुळे निजामी सत्ताधीशांच्या इस्लामीकरणाच्या धोरणास जबरदस्त शह मिळाला. तेंव्हा मात्र आर्य समाजाच्या कार्यावर निजामी शासकाकडून बंधने टाकण्यात येऊ लागली. मीर उस्मान अली खाँ बहादूर (१९११ ते १९४८) या सातव्या निजामाची कारकीर्द आर्य समाजास व हिंदूंना जाचक ठरली. कारण तो धर्मांध होता व खलिफा होण्याचे

स्वप्न पहात होता. मुसल्मान सनातनवाद्यांनी त्याला इस्लाम धर्म जगात सर्वश्रेष्ठ आहे हा मंत्र दिला. जेंव्हा आर्य समाजाची संस्थानात स्थापना झाली तेंव्हा सत्ताधिशांचा समाजा विषयक दृष्टिकोन उदारमतवादी होता. परंतु निजाम मीर उस्मान अली खॉ चे प्रतिगामी धार्मिक धोरणच हैद्राबाद राज्यातील आर्य समाजाच्या वाढत्या प्रभावास कारणीभूत ठरले.

अशा प्रतिकूल परिस्थितीतही इ.स. १८९१ पासून १९३० पर्यन्त आर्य समाजाने आपले सामाजिक व धार्मिक कार्य चालूच ठेवले होते. पण संस्थानातील या काळातील समाजाचे कार्य प्रत्येक शाखेकडून स्वतंत्रपणे चालत होते. त्याला संघटित स्वरूप अद्यापही प्राप्त झाले नव्हते. उत्तरेतील आर्य समाजीस्टांनी संस्थानातील आर्य लोकांना सहकार्याचा हात दिला. श्री. केशवराव कोरटकर, श्रीपाद दामोदर सातळेकर, भाई बंसीलाल, भाई श्यामलाल, ॲड. शेषराव वाघमारे इ. अनेक आर्य समाजी कार्यकर्त्यांनी आपल्या लिखाणातून समाज तत्वांचा प्रचार केला. प्रत्येक शाखेतून स्वतंत्रपणे लढा न चालवता आपण जर आर्य समाजाची एखादी केंद्रिय संघटना केली तर निश्चितच आपणास लढा अधिक तीव्र करून एकजुटीने लढवता येईल असे मत अनेक समाजी कार्यकर्त्यांनी व्यक्त केले. तेंव्हा श्री. केशवराव कोरटकर यांच्या पुढाकाराने हैद्राबाद येथे ` आर्य प्रतिनिधी सभा ` या संस्थेची इ.स. १९३१ मध्ये स्थापना करण्यात आली. सार्वदेशिक आर्य सभेनेही त्यास मान्यता दिली. ` हैद्राबाद ` हे निजामाच्या राजधानीचे ठिकाण होते. शिवाय तेथे आर्य समाजाचे कार्यही प्रभावीपणे चालू होते. मराठवाड्यातील निलंगा, उदगीर, धारूर, अंबेजोगाई, गुंजोटी, रेणापूर, हिंगोली, नांदेड इ. ठिकाणच्या आर्य समाज शाखांनी सामाजिक व धार्मिक हक्काबाबतचा आपला लढा चालूच ठेवला. आर्य प्रतिनिधी सभेच्या स्थापनेनंतर मात्र संस्थानामध्ये संघर्ष वाढत गेला. आर्य समाजाने आपल्या सामाजिक व धार्मिक कार्याबरोबरच शैक्षणिक कार्यालाही प्राधान्य दिले.

आर्य समाज हे इस्लाम धर्मालाच आव्हान ठरेल असे वाटल्यावरून निजामाने संस्थानातील समाजाविषयी प्रतिकूल भूमिका स्वीकारली. आर्य समाजासारख्या

वैदिक धर्म व हिंदू संस्कृती यांच्या रक्षणासाठी सरसावलेल्या संघटनेला शह देण्यासाठी हैद्राबाद राज्यात इ.स. १९२६ मध्येच ` अंजुमन इत्तेहादूल मुसलमीन ` नावाची एक कडवी जातीयवादी संघटना अस्तित्वात आली. बहादूर यार जंग याने या संघटनेद्वारा जातीयतेचे विषय पेरण्यास प्रारंभ केला. सिद्दीक दिनदार याने तर स्वत: महापुरूष बसवेश्वराचा अवतार आहोत असे सांगून लिंगायत लोकांची दिशाभूल करून त्यांचे धर्मांतर करण्याचा प्रयत्न केला. तेंव्हा त्याच्या खोटया प्रचाराला सडेतोडपणे उत्तर देण्याचे काम मराठवाडयातील आर्य समाजाने प्रभावीपणे केले. वरील जातीयवादी संघटनांना शह देणारी आर्य समाजा सारखी प्रभावी संघटना नसती तर कदाचित हिंदूंना हैद्राबाद राज्यातील हिंदूना मुसलमान होण्या-शिवाय अन्य पर्याय राहिला नसता. म्हणूनच निजाम शासन आर्य समाजाचे विरोधी बनले. परंतु निरंतर संघर्षांमुळे आर्य समाज वृध्दिंगत होत गेला.

मराठवाडयात आर्य समाजाने ठिकठिकाणी चांगलेच मूळ धरले होते. हिंदू समाजात परस्परांच्यात प्रेम, सामंजस्य व आस्था निर्माण होण्यास त्याची मदत होऊ लागली. त्याग आणि संघर्ष हेच ब्रीद आर्य लोकांनी मनाशी बाळगले होते. आर्य समाजाच्या सामाजिक कार्यामुळे जातीपातीची बंधने नष्ट होऊ लागली. आंतरजातीय विवाहास प्रोत्साहन मिळाले. आर्य समाजाने मराठवाडयात जातीयता निर्मूलनाचे प्रभावीपणे कार्य पार पाडून सामाजिक समतेची शिकवण दिली. त्यावेळी निजामाच्या लष्करात अस्पृश्यांना सन्मान होता. मात्र जेंव्हा आर्य समाजाने जातीयता निर्मूलनाचे कार्य हाती घेतले तेंव्हा शासक घाबरून गेले. त्यांना आता संस्थान ` आर्यमय ` होणार याची धास्ती वाटू लागली. म्हणून त्यांनी अस्पृश्यांना आपल्या सैन्यात सामावून घेण्याचे ठरवले. जणू काही आर्य समाजाने निजाम राजवटीचा पायाच खोदून काढण्याचा चंग बांधला होता. आर्य समाजाने मराठवाडयातील दलितांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त करून दिली. वैदिक आणि राष्ट्रीय विचार जनमानसात रूजविण्यासाठी समाजाने प्रयत्नांची पराकाष्टा केली. पण हे आर्य संघटन निजामास सहन झाले नाही. तेंव्हा अशा सामाजिक कार्यावर निजामाने बंधने तर टाकलीच पण त्या शिवाय

अनेकांना नोटीसाद्वारे तंबी दिली. परंतु आता आर्य जनांचे मनही निष्ठूर झाले होते. त्यांनी अशा नोटीसांना कचऱ्या समान मानले. आर्य समाजामुळेच मराठवाड्यातील जनतेचे मनोधैर्य वाढले आणि समाजात नैतिकता व राष्ट्रीयत्वाच्या भावनेची वाढ झाली. आर्य समाजाने सदैव दु:खीतांचे दु:ख दूर केले, रोग्यांना औषधे दिली, तडफडणाऱ्या आत्म्यांना शांती कशी मिळेल याची विवंचना केली. म्हणूनच आजही हा कार्याचा वारसा मराठवाड्यातील आर्यजन टिकवून आहेत. गोरगरीबांना, पिडीतांना, निर्वासितांना तसेच दिनदुबळ्यांना जीवनाचा खरा आर्य समाजाने समजावून सांगितला. केवळ मूर्तीपूजा करणे अथवा जुन्या अंधश्रध्दांना व रुढीपरंपराना चिकटून राहणे म्हणजे धर्म नव्हे हे समाजाने तळागाळातल्या सर्वांना सांगितले. म्हणूनच आर्य समाजविषयक लोकांच्या मनात ओढ निर्माण झाली. पण निजामास आर्य समाजाचा हा शिकवणुकीचा मंत्र मात्र तापदायक ठरला. ` वैदिक धर्माचा प्रचार करणे हा आमचा जन्मसिध्द हक्क आहे ` हा मंत्र आर्य समाजी कार्यकर्त्यांनी उचलला. निजामाने खोटे आरोप रचून अनेकांना तुरुंगात डांबले. आर्य समाजाच्या शुध्दी चळवळीबाबत निजाम शासक चिडून होते. त्यांनी धर्मांतराची तबलीग ही चळवळ यशस्वी करण्यासाठी एक स्वतंत्र धार्मिक विभाग चालू केला होता. अनेक दलित बांधवांना बाटवून त्यांनी इस्लाम केले होते. तर बाटवलेल्या हरिजनांना (हिंदूंना) पुन्हा वैदिक धर्मात प्रवेश मिळवून देण्यासाठी आर्य समाजाने शुध्दी आंदोलन केले होते. आर्य समाजाने धर्मांतरीत लोकांना (हिंदूंना) पुन्हा हिंदू धर्मात प्रवेश मिळवून दिला तसेच त्यांना स्वधर्माची जाणीव करून दिली. आर्य समाजाचे हे शुध्दी कार्य ` इत्तेहादूल मुसलमीन ` सारख्या जातीय संघटनेला सहन झाले नाही. त्यांनी उघडपणे अत्याचाराला प्रारंभ केला. हिंदूंना त्यांचे उत्सव साजरे करता येत नव्हते तर आर्य समाजी लोकांना आपली धार्मिक कार्ये पार पाडता येत नव्हती. इतकेच नव्हे तर ` सत्यार्थ प्रकाश ` ही आर्य समाजाची गीताही लोकांनी आपल्याजवळ बाळगणे निजाम राज्यात गुन्हा ठरू लागला. इ.स. १९२९ मध्ये गश्ती निशाण

५३ हा कायदा जेंव्हा अस्तित्वात आला तेंव्हा तर आर्य समाजावरील निजामी बंधनांचा कहर झाला. हैद्राबाद राज्यात विशेषत: मराठवाडयात हिंदूंची स्थिती फार दयनीय झाली होती. हिंदूंना शैक्षणिक, आर्थिक, राजनैतिक व सामाजिक क्षेत्रात महत्वाच्या हक्कांपासून वंचित ठेवण्यात आले होते. तथापि अशा संघर्षमय वादळी वाऱ्यातही आर्य समाजाने आपला समतेचा दिवा विझू दिला नाही. त्यासाठी मराठवाडयातील अनेक कार्यकर्त्यांना बलीदान करावे लागले. काहींना लाठया खाव्या लागल्या. काहींच्या घराची राखरांगोळी झाली तर काहीनी प्रपंचावर तुळशीपत्रे ठेवून समाजाचे कार्य केले. इथे एक गोष्ट नमूद करावीशी वाटते की, आर्य समाजी हे त्यागाचे प्रतीक होते. अनेक आर्य समाजी तरूणांनी आजन्म ब्रम्हचारी राहून समाजाचे कार्य केले. यावरून त्यांचा त्याग व निष्ठा प्रत्ययास येते. आपणास आपल्या धार्मिक व सामाजिक हक्कांचा वाटा मिळाला पाहिजे व त्यावरील सत्ताधिशांचे जोखड झुगारून टाकले पाहिजे असे सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभेपासून सर्वांनाच वाटू लागले. इ.स. १९३८ मध्ये आर्य समाजाचा सत्याग्रहाचा लढा सुरू झाला. त्यासाठी उत्तरेतून आर्य समाजी जथ्ये हैद्राबाद राज्यात विशेषत: मराठवाडयात येऊन दाखल झाले. मराठवाडयातील आर्य समाजीस्टांनी धार्मिक व सामाजिक स्वातंत्र्यासाठी प्रखर लढा उभा केला. अखेर १९३९ मध्ये निजामास माघार घ्यावी लागली व आर्य समाजाच्या काही मागण्या मान्य कराव्या लागल्या. परंतु `सुंभ जळेल पण पिळ जळणार नाही` असे झाले. आर्य समाज १९४० पासून संघर्षाऐवजी विधायक कार्याकडे वळला तर निजाम सत्ताधिशांनी मात्र पुन्हा आर्य समाजावार अन्याय व अत्याचार करण्यास प्रारंभ केला. आर्य समाजाने अनेक शैक्षणिक संस्था स्थापून आर्य भाषेत (हिंदी) शिक्षण देण्यास प्रारंभ केला. अनेक पाठशाळा उघडल्या. शिक्षण संस्था उघडून शिक्षण प्रसाराच्या कार्यास समाजाने आरंभ केला. इ.स. १९४० पूर्वी सुध्दा आर्य समाजाने मराठवाडयात शिक्षण प्रसाराचे नेत्रदिपक कार्य केले. आर्य समाजाचे वैचारिक जागृतीचे कार्य खंडीत व्हावे म्हणून संस्थानामधील व संस्थानाबाहेरील वृत्तपत्रे व साहित्य यावर निजामी सरकारने अनेक बंधने घातली.

इ.स. १९४२ ते १९४८ हा काळ तर निजामाच्या अंत्यत जुलमी राजवटीचे दर्शन घडविणारा काळ होता. तेंव्हा आर्य समाजाने उदगीर, निजामाबाद, गुलबर्गा, नारायण पेठ इ. अनेक ठिकाणी परिषदा घेऊन आपले सामाजिक व धार्मिक कार्य मराठवाड्यात सर्वत्र फैलावण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न केले. इ.स. १९४२ च्या उदगीर येथील आर्य परिषदेने निजामास १९३९ च्या कराराची आठवण करून दिली. इतकेच नव्हे तर जर निजामाने आपला मार्ग बदलला नाही तर आर्यांना पुन्हा संघर्षाचा मार्ग पत्करावा लागेल असा इशारा दिला. पण निजाम शासक विशेषत: मीर उस्मान अली खाँ व त्याचे साथीदार मदांध, सत्तांध बनले होते. १९४६ मध्ये इत्तेहादूल मुसलमीन संघटनेचा नेता बहादूर यार जंग याचे निधन झाले. त्यानंतर कासिम रझवी, ज्याला सालार-ए-कासिम रझवी म्हणून ओळखण्यात येते, त्याने सूत्रे हाती घेतली. त्याने हिंदूंच्यात दहशत व दबाव निर्माण करण्यासाठी रझाकार नावाची संघटना निर्माण केली आणि अन्याय, अत्याचाराचा कहर केला. ' हर एक मुसलमान इस सलतनतका बादशहा है ' ही त्याची वल्गना होती. मात्र हा अन्याय दूर करण्यासाठी आर्य समाजास राजकीय रंग परिधान करावा लागला. अखेरच्या पर्वात आर्य समाज व हैद्राबाद स्टेट काँग्रेस यांनी राजकीय स्वातंत्र्यासाठी संयुक्तपणे लढा दिला. आर्य समाजाच्या अद्याप पर्यन्तच्या लढ्यातही स्वातंत्र्याची भावना होतीच. आर्य समाजाचे हे आंदोलन मुळात धार्मिक स्वातंत्र्याच्या इच्छेतून निर्माण झाले पण कालाच्या ओघात त्याने वेगवेगळ्या दिशा घेतल्या. धार्मिक स्वातंत्र्यातूनच सामाजिक व सांस्कृतिक स्वातंत्र्याची इच्छा निर्माण झाली. त्यामुळे हैद्राबाद राज्यास स्वातंत्र्य मिळवण्यासाठीच्या लढ्यात आर्य समाज आघाडीवर होता. आर्यसमाजाच्या कार्याच्या पार्श्वभूमीमुळे स्टेट काँग्रेसला आपले पाय हैद्राबाद राज्यात पर्यायाने सध्याच्या मराठवाड्यात स्थिर करता आले. हैद्राबादच्या लढ्यामध्ये आर्य समाजाने केलेले कार्य हे जातीय स्वरूपाचे होते असा

आरोप आर्य समाजावर करण्यात येतो. बरेचशे आर्यजन आर्य समाजातून स्टेट कॉंग्रेससारख्या राजकीय संघटनेमध्ये सामील झाले आणि त्यांनी हैद्राबाद मुक्ती संग्रामात मोलाची कामगिरी बजावली. हैद्राबाद संस्थान व मराठवाडयातील चळवळींचा साकल्याने विचार केल्यानंतर आर्य समाजाची तत्कालीन चळवळ हिंदूंना संजीवनी देणारी ठरली असेच म्हणावे लागते. भिन्न भाषेतील, भिन्न संप्रदायातील लोकांना एकत्र आणून त्यांना एका जुलमी राजवटी विरूध्द उभे करण्याचे महान कार्य आर्य समाजाने केले. आर्य समाजी लोकांनी स्वत: सर्व प्रथम त्याग केला व त्यानंतर त्यागाची शिकवण दिली. म्हणूनच आर्य समाजास हैद्राबादच्या मुक्ती संग्रामात भरवी कार्य करता आले. हैद्राबाद मुक्ती संग्रामात आर्य समाजाचा सिंहाचा वाटा होता हे इतिहासास नाकारता येणार नाही. आजही आर्य समाजाच्या शिकवणुकीने भारावलेल्या स्थितीत आर्य समाजी कार्यकर्ते मराठवाडयात आपले सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय जागृतीचे कार्य करीत आहेत.

अशाप्रकारे आर्य समाजाने मराठवाडयात धार्मिक व सामाजिक जागृती घडवून आणून विविध धार्मिक व सामाजिक सुधारणा अंमलात आणल्या. मराठवाडयात शिक्षण प्रसार करण्याचे उल्लेखनीय कार्य आर्य समाजानेच केले. मराठवाडयातील हिंदूंच्या रक्षणाची जबाबदारी उचलून आर्य समाजाने त्यांचे धार्मिक व सांस्कृतिक क्षेत्रात उन्नयन घडवून आणले. हैद्राबाद राज्यातील निजामाच्या जुलमी राजवटीस व इस्लामीकरणाच्या धोरणास आर्य समाजाने संघटितपणे विरोध केला. निजामाच्या जुलमी धोरणास निर्भयपणे प्रतिकार करून बहुसंख्य हिंदू प्रजेच्या धार्मिक, सामाजिक आणि राजकीय हक्कांच्या प्राप्ती-साठी आर्य समाजाने सत्याग्रहाच्या मार्गाचा अवलंब करून मराठवाडयात अनेक लढे उभारले. हैद्राबादचा मुक्ती संग्राम मराठवाडा विभागात तीव्र होण्यास बऱ्याच अंशी आर्य समाज जबाबदार होता. मराठवाडयातील आर्य समाजाने हैद्राबाद मुक्ती संग्रामात स्पृहनीय कामगिरी बजावली.

# संदर्भ ग्रंथ सूची

# संदर्भ ग्रंथ सूची

## प्राथमिक साधने


अ) अप्रकाशित साधने :

१) हैद्राबाद येथील आंध्र प्रदेश दप्तरखान्यातील कागदपत्रे -

1. File No. L7/a/09 (Confidential), The Arya Samaj White Paper.
2. File No. 6/AS/SIF/No.406 (R), Arya Samaj in Udgir.
3. File No. 1148/L7/a/09, Arya Movement in Hyderabad.
4. File No. 769, Arya Samaj Agitation.
5. File No. 649 'Satyagraha'.
6. File No. 897, Failure of Samajist Movement .
7. File No. L7/a/09 (Confidential) Constitutional Affiars Secretariat, Section Papers Vol. V.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | Digvijay | 24-8-1939 | Solapur | Page | 53 |
| 2. | ,, | 5-9-1939 | ,, | ,, | 54 |
| 3. | ,, | 10-10-1939 | ,, | 55 | 55 |
| 4. | ,, | 9-11-1939 | ,, | ,, | 57 |
| 5. | ,, | 26-11-1939 | ,, | ,, | 62 |
| 6. | Kesari | 21-11-1939 | Poona | - | - |
| 7. | Chitra (Weekly) | 21-11-1939 | Bombay | ,, | 83 |

२) मुलाखती : आर्य समाजाच्या चळवळीत सक्रिय भाग घेतलेल्या खालील वयोवृध्द, तपोवृध्द व्यक्तींच्या मुलाखती घेतल्या.

पं. उत्तममुनीजी वानप्रस्थी, विद्यानगर, उस्मानाबाद, दि.१८-११-८६,
प्रा. वेदकुमार वेदालंकार, विद्यानगर, उस्मानाबाद दि.१८-११-८६,
कृष्णाथराव जगताप, तुळजापूर, दि. २८-११-८६,
देवमुनी वानप्रस्थी, तुळजापूर, दि. १३-१-८७,
प्रमोद प्रसाद तिवारी (गोकुळ प्रसाद तिवारी यांचे नातू), किल्ले धारूर, दि. २९-६-८७,
पं वेदभूषण, (भाई बंसीलाल यांचे चीरंजीव), हैद्राबाद दि.१६-७-८७,
श्री. बाबुलालजी, आर्य समाज, हैद्राबाद, दि. १७-७-८७,
सुशीलादेवीजी भारती (भाई बंसीलाल यांची मुलगी), हैद्राबाद, दि. १७-७-८७.
आचार्य खंडेराव कुलकर्णी, हैद्राबाद, दि. २०-७-८७,
पं. कृष्णदत्तजी, हैद्राबाद, दि. २१-७-८७,
संग्रामसिंह चौहाण, औरंगाबाद, दि. ६-८-८८,
पं. ज्ञानेंद्र शर्मा, औरंगाबाद, दि. ७-८-८८,
पं. नरदेव स्नेही, औरंगाबाद, दि. ८-८-८८,
श्री. बळीराम पाटील, निलंगा, दि. २१-८-८८.

ब) प्रकाशित साधने : आर्य समाजाची कागदपत्रे व समाजविषयक साहित्य

१. The Constitution of the Arya Samaj Principles and Bye laws - published by Sarvadeshik Arya Pratinidhi Sabha, Delhi, 1972.

२. आर्य प्रतिनिधी सभा, आंध्र प्रदेश के नियमोपनियम (अन्जुमन रिफाही सरकार आली निशान १ सन् १३५० फसली) मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा, आंध्र प्रदेश, हैद्राबाद, १९८२.
३. सार्वदेशिक सभा के निर्णय (१९०८ से १९६० तक) सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, नई दिल्ली विक्रम सम्वत २०१८, दयानन्द १३८.

३) अहवाल :

१) आर्य समाज सुलतान बाजार, हैद्राबाद स्टेट का पचास वर्षीय कार्य विवरण, प्रकाशक - बलदेव मंत्री, आर्य समाज सुलतान बाजार हैद्राबाद दि. १६-५-१९४३.
२) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का १० वर्षीय कार्यविवरण, (१९३१ ते १९४० तक) प्रकाशक - पं. नरेंद्रजी, आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट.
३) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का १३ वा वार्षिक विवरण, (ता. ५ एप्रिल १९४३ इसवीसे ता. २४ मार्च १९४४ इसवी तक) प्रकाशक - पं. नरेंद्रजी, मंत्री आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद.
४) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का चौदहवाँ वार्षिक विवरण, (२५-३-१९४४ से २८-२-१९४९ तक) प्रकाशक - बंसीलाल व्यास, मंत्री आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद.
५) आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद स्टेट का २० वा वार्षिक विवरण, दि. ३०-२-१९४९ से २४-३-१९५५ तक) प्रकाशक, मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद.

४) पत्रव्यवहार :

१) पं. वानप्रस्थी उत्तममुनीजी - धर्माबाद, जि. नांदेड यांचे हस्तलिखित पत्र दि. ११-८-१९८८.

२) पं. कृष्णदत्तजी - नला कुंठा, पद्मानगर, हैद्राबाद यांचे हस्तलिखित पत्र दि. २७-८-१९८७.

५) वृत्तपत्रे :

१) आर्य भानू - आर्य प्रतिनिधी सभा, हैद्राबाद का साप्ताहिक मुख पत्र. संपादक विनायकराव विद्यालंकार, २२ मार्च, १९४८

२) ` आर्य भानू ` - १४ जून १९४८.

३) ` आर्य भानू ` - १६ ऑगस्ट १९४८.

४) ` आर्य भानू ` - २३ ऑगस्ट, १९४८.

५) ` आर्य भानू ` - ११ आक्टोबर, १९४८.

६) ` आर्य भानू ` - २५ आक्टोबर, १९४८.

७) ` आर्य भानू ` - १ नोव्हेंबर, १९४८.

८) ` आर्य जगत ` (साप्ताहिक), दिल्ली, १४ ऑगस्ट, १९८८.

९) ` वैदिक आदर्श ` उर्दू वृत्तपत्र, संपादक चंदूलालजी, सूत्रधार विनायकराव विद्यालंकार, आर्य प्रतिनिधी सभा रेसिडेन्सी एरिया, हैद्राबाद येथून प्रकाशित, इ.स. १९३४.

१०) ` कर्मयोगी ` - सोलापूर - २७ फेब्रुवारी १९३०.

११) ` कर्मयोगी ` - सोलापूर - २० मार्च १९३०.

१२) ` निजाम विजय ` - १ जुलै, १९३०.

१३) ` निजाम विजय ` - २९ जुलै, १९३०.

१४) ` हैद्राबाद समाचार ` (साप्ताहिक) ९-१६ मार्च १९७६, हैद्राबाद.

१५) ` महाराष्ट्र टाईम्स ` - ६ डिसेंबर १९८७.

१६) The Deccan Times (Muslim English Weekly), Madras, 17 August 1939.

६) मासिके :

१) वैदिक गर्जना (पाक्षिक) - महासंमेलन विशेषांक महाराष्ट्र प्रांतीय प्रथम आर्य महासम्मेलन, नांदेड. संपादक हरिश्चंद्र प्रकाशक - मंत्री महाराष्ट्र आर्य प्रतिनिधी सभा, वाजेगांव, नांदेड, १ ऑगस्ट, १९८२.

२) वैदिक गर्जना - (पं. नरेंद्र विशेषांक) - १५ एप्रिल, १९८५ अंक. २१.

३) वैदिक गर्जना - (महात्मा आनंदमुनी स्मृती अंक), १५ मार्च १९८४, अंक १-२.

४) वैदिक गर्जना - १ फेब्रुवारी १९८१, अंक २१

५) वैदिक गर्जना - १५ जून १९८५, अंक २२.

६) वैदिक गर्जना - १ जानेवारी १९८४, अंक १७.

७) आर्य जीवन - शामलाल बलीदान विशेषांक (आर्य प्रतिनिधी सभा, मध्य दक्षिण का मासिक पत्र) प्रकाशक - आर्य प्रतिनिधी सभा, मध्य दक्षिण हैद्राबाद, १९६५.

८) आर्य जीवन - बंसीलाल स्मृती अंक, डिसेंबर १९६९.

९) आर्य जीवन - संम्मेलन विशेषांक, जुलै, १९७१.

१०) जन ज्ञान - प्रकाशक दयानंद संस्थान, दिल्ली, १९७६.

११) The Indian States and Zamindaries by Residency Hyderabad Deccan, Monthly Journal Vol.I Feb.1932,No.10.

७) स्मरणिका :

१) आर्य सम्मेलन (स्मरणिका), निलंगा विशेषांक प्रकाशक मंत्री, आर्य प्रतिनिधी सभा, बाजेगांव, नांदेड, मे १९८८.

२) सविता क्रांती संस्मरण, सविता क्रांती स्मरण प्रकाशन, जालना, १९८८.

## दुय्यम साधने

अ) अप्रकाशित साधने :

पीएच.डी. पदवीसाठी सादर केलेले अप्रकाशित प्रबंध.

१) औचरमल ल.वा. - "निजाम कालीन मराठवाड्यातील समाजरचना आणि अस्पृश्य वर्गाचे स्थान" मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद, १९८६.

2) Dhengle B.S. - "A Study of The Contribution of Marathwada To Hyderabad Freedom Struggle", Marathwada University, Aurangabad, 1986.

3) Kate P.V. - "Impact of the Nizam's Regime on Marathwada (1724-1948)", Marathwada University, Aurangabad, 1978.

ब) प्रकाशित साधने :

१) मराठी

१) काळे प्रा. भगवान - मराठवाडा काल आणि आज, संकेत प्रकाशन, जालना, १९८६.

२) कुरूंदकर प्रा. नरहर - हैद्राबाद विमोचन आणि विसर्जन, संपा. द.प.जोशी, मराठी साहित्य परिषद, हैद्राबाद, १९८५.

३) कुरूंदकर प्रा. नरहर - जागर, रा.ज. देशमुख आणि कंपनी, पुणे, १९६९.

४) कुंटे डॉ. म.ग. - बहामनी राज्याचा इतिहास, मॅजिस्टिक बुक स्टॉल, मुंबई, १९६६.

५) गर्गे स.मा. - संघर्ष, खंड पहिला (१९३६ ते १९४७), आ.कृ. वाघमारे, कृति समिती, औरंगाबाद, १९८१.

६) चाकूरकर ल.वि. - मी पाहिलेला हैद्राबाद मुक्ती संग्राम, स्वप्रकाशित, चाकूर, जि. लातूर, १९८३.

७) जोशी सु.ग. (सं.) - मराठवाडा संशोधन मंडळ वार्षिक, १९७५, राधाकृष्ण रामचंद्र प्रकाशन, शिरूर, ताजबंद, जि. उस्मानाबाद, १९७५.

८) जोशी पं. महादेवशास्त्री (सं.) - भारतीय संस्कृती कोश (प्रथम खंड), भारतीय संस्कृती कोश मंडळ, पुणे, १९८२.

९) ठकार भा.र. (सं.) - संस्थान परिचय अर्थात मराठवाडा व्यक्ती आणि परिचय, परिचय कचेरी, औरंगाबाद, १९४३.

१०) तीर्थ स्वामी रामानंद - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्रामाच्या आठवणी, अनु.वि.पा. देऊळगांवकर, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७६.

११) देशपांडे (जाफराबादकर) द.ग. - हैद्राबाद व-हाड मुक्ती संग्राम, नवभारत प्रकाशन संस्था, मुंबई, १९८७.

१२) देशपांडे ब्रह्मानंद - देवगिरीचे यादव, समर्थ प्रकाशन, औरंगाबाद, १९७५.

१३) पोतदार वसंत ब. - हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, स्वप्रकाशित, आष्टाकासार, जि. उस्मानाबाद, १९८४.

१४) परळीकर अशोक - हैद्राबाद मुक्ती संग्रामातील अज्ञात कथा, राजहंस प्रकाशन, पुणे.

१५) परळीकर अशोक - हैद्राबाद मुक्ती संग्रामातील ओजस्वी कथा, नटराज प्रकाशन, परभणी, १९७७.

१६) पगडी सेतु माधवराव - जीवन सेतू (आत्मचरित्र), कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे, १९६९.

१७) पगडी सेतु माधवराव - हैद्राबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास, मराठवाडा साहित्य प्रकाशन, हैद्राबाद, १९५६.

१८) पवार डॉ.जयसिंगराव - मराठी साम्राज्याचा उदय आणि अस्त, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९७२.

१९) पाटील व्ही.बी. - महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, अजब पुस्तकालय, कोल्हापूर, १९८६.

२०) बिंदू दिगंबरराव - हैद्राबाद राज्याचे विसर्जन (आत्मकथन) संपा. श्रीधर रंगनाथ कुलकर्णी, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, १९८६.

२१) बी. रघुनाथ - मिटलेले आकाश (कथा संग्रह), मौजे प्रकाशन गृह, मुंबई, १९६५.

२२) मालेराव अनंत - पेटलेले दिवस (आठवणी), श्री. विद्या प्रकाशन, पुणे, १९८५.

२३) मालेराव अनंत - हैद्राबादचा स्वातंत्र्य संग्राम आणि मराठवाडा, स्वामी रामानंद तीर्थ संशोधन संस्था, औरंगाबाद, १९८७.

२४) मराठवाडा दर्शन - जे.बी. प्रकाशन, औरंगाबाद, १९७६.

२५) लाड जी.डी. - पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, भारती विद्यापीठ प्रकाशन, पुणे, १९८६.

२६) शर्मा राघवेंद्र - हैद्राबाद व देशी संस्थाने अर्थात हैद्राबादची राज्यपध्दती आणि संस्थानी स्वराज्याच्या चळवळी, आर्यभूषण, प्रेस, पुणे, १९२८.

२७) साळुंखे एम.बी. - स्वातंत्र्य सैनिकांच्या आठवणी खंड १ ला भारत सहकार डायरी, पुणे १९८३.

२८) सूर्यवंशी उत्तमराव, टाकळ गव्हाणकर - हैद्राबादचा मुक्तीसंग्राम, सांगाती प्रकाशन, नांदेड, १९८५.

२९) स्वातंत्र्य सैनिक चरित्र कोश, महाराष्ट्र राज्य, मराठवाडा विभाग, कार्यकारी संपादक, दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई, १९७६.

३०) हरदास वीणा - लोकनायक अणे व त्यांचा काळ भाग-१, लोकनायक अणे जन्मशताब्दी समिती, वणी, जि. यवतमाळ, १९८२.

## १) हिंदी


१) आर्य सवितादेवी - वक्तव्य और संदेश, नंदलाल आर्य, जालना, १९६८.

२) आर्य निर्देशिका - सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली, १९७५.

३) कुलकर्णी खंडेराव तथा पं. कृष्णदत्तजी - जीवनज्योती हुतात्मा माई शामलालजी का पावन चरीत्र - आर्य प्रतिनिधी सभा, मध्य दक्षिण, हैद्राबाद, १९६४.

४) कुलकर्णी खंडेराव - हैद्राबाद का मुक्ती संग्राम कुछ अज्ञात पृष्ठ - भारतीय विचार साधना, पुणे, १९७५.

५) कुलकर्णी खंडेराव - विनायकराव विद्यालंकार (स्वयं अपनी मेरी और औरोंकी नजरोमें), केशव स्मारक शिक्षा समिती, हैद्राबाद, १९८१.

६) कौशिक अशोक - आर्य समाज के सौ रत्न, सूर्य प्रकाशन, दिल्ली, १९८०.

७) गुप्ता लक्ष्मी नारायण - पंडीत नरेंद्र हैद्राबाद के लोहपुरूष, पं. नरेंद्र अभिनंदन समिती, हैद्राबाद, १९७५.

८) जिज्ञासू राजेंद्र - वीर संन्यासी, श्री. स्वामी सर्वानंदजी दयानंद मठ, दिनानगर (पंजाब) १९६६.

९) पंडीत नरेंद्र - जीवन की धूप छाँव, (जीवन चरीत्र) पं. प्रियदत्त शास्त्री, आर्य समाज मॉडेल टाऊन, पानिपत (हरीयाना), १९८१.

१०) पं. नरेंद्र - हैद्राबाद का स्वाधीनता संघर्ष और आर्य समाज, वैदिक पुस्तकालय, हैद्राबाद, १९६७.

११) पं. नरेंद्र - हैद्राबाद के आर्योंकी साधना और संघर्ष, गोविंदराम दासानंद स्वर्णजयंती, प्रकाशन, दिल्ली, १९७३.

१२) निजामशाहीमें धार्मिक स्वतंत्रतापर कुठाराघात अर्थात धर्मसम्बंधी आज्ञाओंका संग्रह, प्रकाशक - सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, देहली (इ.स. १३४७ फसली के कुछ उदाहरण)

१३) राठौर शामलाल - मुक्ती संग्राम में नांदेड, (निजाम हैद्राबाद के एक जिले का मुक्ती संग्राम) १९३८ से १९४८, ज्योती प्रकाशन, नांदेड, १९७६.

१४) विद्यालंकार जयदेवशर्मा तथा साहित्यलंकार सूर्यदेव शर्मा - हैद्राबाद सत्याग्रह का रक्तरंजित इतिहास, आर्य साहित्य मंडळ, अजमेर, १९४७.

१५) वाचस्पती इंद्रविद्या - आर्य समाज का इतिहास, भाग-२, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली, १९५७.

१६) विद्यालंकार वंशीधर (सं.) - विनायकराव अभिनंदन ग्रंथ, विनायकराव षष्टीवर्षोत्सव समिती आर्य प्रतिनिधी सभा (दक्षिण) १९५६.

१७) विद्यालंकार विजयवीर (सं.) - वंदेमातरम रामचंद्रराव अभिनंदन ग्रंथ (वेदोक्त विचारधारा का मासिक प्रकाशन), वैदिक आदर्श का विशेषांक, १९७७.

१८) वेदालंकार क्षितीश - निजाम की जेलमे, दि वर्ल्ड पब्लिकेशन, नई देहली, १९८६.

१९) वैद्य काशिनाथराव - अनुवादक खंडेराव कुलकर्णी तथा पंडीत कृष्ण दत्तजी - न्यायमूर्ती केशवराव कोरटकर का चरीत्र, मंत्री, केशवस्मारक व उ.विद्यालय, हैद्राबाद, १९६७.

२०) विद्यालंकार सत्यकेतु (सं.) - आर्य समाज का इतिहास भाग-२ (आर्य समाज का प्रचार, प्रसार १८८३ से १९४७ तक), आर्य स्वाध्याय केंद्र, दिल्ली, १९८४.

२१) शास्त्री आचार्य चंद्रशेखर - राष्ट्र निर्माता सरदार पटेल, सोसायटी फॉर पार्लमेंटरी स्टडीज, नई देहली, १९६३.

२२) सार्वदेशिक आर्य महासम्मेलनों के अध्यक्षीय भाषण, प्रकाशक सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली, १९६१.

२३) सरस्वती ओऊमानंद - आर्य समाज के बलीदान, हरियाणा साहित्य संस्थान, गुरुकुल झाज्जर (रोहतक), सं. २०३५ वि.

२४) स्वामी स्वतंत्रतानंदजी महाराज (हैद्राबाद सत्याग्रह के फिल्ड मार्शल) - आर्य समाज के महाधन, सार्वदेशिक आर्य प्रतिनिधी सभा, दिल्ली, १९४८.

## 3) ENGLISH BOOKS


1) Aurangabad District Gazetteer, 1977.
2) B. Arunachalam - Maharashtra, (A Study in Physical and Regional Setting Resources Development), Mahendrakumar A. Sheth and Company, Bombay, 1967.
3) Briggs Henry George - The Nizam - His History and Relations with the British Government, Vol. I, II., Manus Publications, Delhi, 1861, 1985.
4) Bhir District Gazetteer, 1969.
5) Case of Arya Samaj in Hyderabad State , published by International Aryan League, Delhi, 1948.
6) Chaturvedi B.N. - Hyderabad State (A Regional and Economic Survey), Hyderabad Geography Association, Hyderabad, Deccan, 1956.
7) Date S.R. - Bhaganagar Struggle (A Brief History of the Movement led by Hindu Mahasabha in Hyderabad State 1938-39) Published by B. Sadhashiva Peth, Poona.
8) Hyderabad State Gazetteer - published by Superintendent of Government of Calcutta, 1909.
9) The First Nizam - The Life and Time of Nizam-ul-Mulk Asaf Jahi, New York, Asia, 1963.
10) Munshi K.M. - The End of an Era, Hyderabad Memories, Bhartiya Vidya Bhavan, Bombay, 1957.
11) Mascreen P.J. - Makers of Modern India Kalyani Publishers, New Delhi, 1983.

12) Menon V.P. - The Story of the Integration of Indian States, Orient Publication, Delhi, 1956.

13) Nanded District, Gazetteer, 1971.

14) Nizam Defence Examined and Exposed (A Rejoinder to the Pamphlet - The Arya Samaj in Hyderabad), published by The International Aryan Legauge, Delhi, 1938.

15) Osmanabad District, Gazetteer, 1972.

16) Pandit Narendra - Arya Samaj in Hyderabad, Arya Samaj Foundation Century Celebration Committee, 1975.

17) Pugadi Setu Madhavrao - Freedom Struggle in Hyderbad and a connected Account Vol. II, published in 1956.

18) Patavardhana Achutrao - Peoples Movement in Hyderabad, K. Bhagavanrao, Nande, 1947.

19) Parabhani District, Gazetteer, 1967.

20) Rai Lala Lajapat - The Arya Samaj Longmans Green and Company, London, 1915.

21) Said Ahmed (Nawab of Chattari)- Hyderabad A Souvenior, Hyderabad Deccan Govt. Central Press, 1944.

22) Syed Abid Hasan - Whiter Hyderabad ? (A brief study of some of outstanding problems of the Premier Indian State), Red Hills, Hyderabad Deccan, 1935.

23) The Chronology of Modern Hyderabad (1720 to 1890), The Central Record Office, Hyderabad Government, 1954.

24) The Arya Samaj in Hyderabad, Nizam Sarkar, Hyderabad, 1938.

25) The Freedom Struggle in Hyderabad Vol. III (1885-1920), Hyderabad State Committee, Hyderabad, 1957.

### ४) नियतकालिके

भारतीय इतिहास आणि संस्कृती (त्रैमासिक), मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालय, मुंबई, जाने.मार्च १९८६, जुलै-सप्टें. १९८६, आक्टो-डिसे. १९८६, जाने.मार्च १९८७, जाने-मार्च १९८८.

संशोधक (त्रैमासिक), इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे, डिसेंबर १९८६, मार्च-जून १९८८.

अमृतपुत्र (त्रैमासिक) - सौ. त्रिवेणी लोखंडे, रेणापूर, जि. बीड, जुलै-सप्टें. १९७६, आक्टोबर-डिसेंबर १९७६.

### 5) JOURNALS AND MAGAZINES

Marathwada University Journal of Social Sciences, Marathwada University, Aurangabad, Vol. XV and VI, 1976-77 No. 3, Vol. XVII and XVIII 1978-79, No. 3, Vol. XXII, 1984-85, No. 3.